RNI NO.-54719/84

# धनसंतोष

■ संस्थापक | श्री. भाऊसाहेब नलावडे ■ संपादक | सौ. विमल नलावडे ■ PRN No. - STR/009/2015-2017

वर्ष ३२ वे | अंक १९ वा | शुक्रवार दि. ०२|१०|२०१५ | २ रुपये

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव




कर्मवीर जयंती सोहळ्यात बोलताना प्रा. डॉ. कन्हैया कुंदप सोबत प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, डॉ. मोहन राजमाने आदी.

## कर्मवीरांनी श्रमाला महत्व प्राप्त करुन दिले : प्रा. डॉ. कन्हैया कुंदप

कोरेगाव - राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याचे काम कर्मवीर अण्णांच्या रयत शिक्षण संस्थेने केले असून अण्णांनी श्रमाला महत्व प्राप्त करुन दिले आहे. रयत शिक्षण संस्थेच्या प्रेरणा समजून घ्याव्यात. रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीला कोरेगावच्या मातृभूमीचा स्पर्श लाभला आहे. असे प्रतिपादन प्रा.डॉ. कन्हैया कुंदप यांनी केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या डी.पी. भोसले महाविद्यालयात आयोजित केलेल्या पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १२८ व्या जयंती सोहळ्याप्रसंगी ज्येष्ठ मराठी साहित्यिक प्रा.डॉ. कन्हैया कुंदप बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कराडच्या सद्गुरु घाडगे महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने उपस्थित होते.

प्रा.डॉ. कुंदप पुढे म्हणले, रयत शिक्षण संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. आज अनेक क्षेत्रात तसेच अनेक अधिकारी महाराष्ट्र शासनाच्या सेवेत कार्यरत आहेत. कर्मवीर अण्णांनी श्रमाला महत्व प्राप्त करुन दिल्याने आज हजारो विद्यार्थी स्वावलंबनातून आपले शिक्षण घेत आहेत. समाजाच्या परिवर्तनामध्ये संस्थेचे योगदान महत्वपूर्ण आहे.

प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. अरविंद माळी, प्रा.डॉ. तांबोळी आर.ए. तसेच प्रा. आर.के. मुल्ला व विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. मोहन राजमाने म्हणाले आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तुत्वातून यश मिळवावे. महाविद्यालयात उपलब्ध असणाऱ्या भौतिक, शैक्षणिक, क्रिडा व कलेच्या सुविधा कौतुकास्पद व अभिमानास्पद आहेत. या सर्व सुविधांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.

कर्मवीर जयंतीच्या निमित्तेने घेण्यात आलेल्या रांगोळी, निबंध, वक्तृत्व स्पर्धा तसेच हिंदी दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या निबंध व वक्तृत्व स्पर्धा तसेच बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.सी.ए., ११ वी, १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवसाय शिक्षण विभाग या वर्गातील प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा व प्रा.डॉ. संजय माधव साठे यांनी महाविद्यालयास देणगी दिल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी केले. कार्यक्रमास कार्याध्यक्ष प्रा. एस.जी.

## डी. पी. कॉलेजचे यश





कोरेगाव | कोल्हापूर तायक्वॉंदो ॲम्प्युच्युअरच्या वतीने जयसिंगपूर येथे झालेल्या विभागीय तायक्वॉंदो स्पर्धेत डी. पी. भोसले कॉलेजच्या पुजा बाळकृष्ण जगताप हिने सुवर्ण पदक मिळविले, तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेत पुजा जगताप हिने ४६ ते ४९ किलो वजन गटात सुवर्ण, रजत पांडुरंग केंजळे ५८ ते ६२ किलो गटात रौप्य पदक मिळविले. त्यांचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत